**CNR No. :- MHSI100003092018**

## –: नियमित दिवाणी मुकदमा क्र. ३८/२०१८ :–

## –: निशाणी १४ वरील आदेश :–

वादीने प्रस्तुतचा अर्ज नि.क्र. ९० ते नि.क्र.९२ अर्जांमध्ये दुरुस्ती होऊन मिळणेसाठी केला आहे.

०२. प्रस्तुत अर्जात वादीने असे कथन केले आहे की, नि.क्र. ९० ते नि.क्र.९२ मध्ये नमुद मजकुरात प्रतिवादी क्र. १६ ही मयत असल्याने तिचे वारस मुलगे प्रतिवादी क्र. १४ व १५ हे या दाव्याच्या कामी यापुर्वीच सामील आहेत या मजकुराऐवजी नजरचुकीने प्रतिवादी क्र. १६ हिचे वारस प्रतिवादी क्र. १७ व १८ असे नमुद झाले आहे. सबब, त्याऐवजी प्रतिवादी क्र. १४ व १५ अशी दुरुस्ती होऊन मिळणेस परवानगीसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०३. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जास तीव्र आक्षेप नोंदविला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, वादीचा अर्ज खोटा व खोडसाळ असून तो नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०४. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. उभय विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. दाव्याचे स्वरुप पाहता वादी मागत असलेली दुरुस्ती दावा गुणदोषावर निकाली करणेकरीता महत्वाची असल्याचे दिसून येते. प्रतिवादी यांनी अर्ज मंजूर करण्यास तीव्र आक्षेप नोंदविलेला आहे. वादीच्या या कृत्यामुळे प्रतिवादी व परीणामी

न्यायालयाचा अमुल्य वेळ वाया गेलेला आहे. परंतु, केवळ विलंब झाला म्हणुन वादी मागत असल्याप्रमाणे दुरुस्ती नाकारणे हे नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन होणारे नाही. वादी मागत असलेल्या दुरुस्तीमुळे दावा परीणामकारकरीत्या निकाली करण्यास न्यायालयास मदतच होणार आहे. अर्ज नामंजूर केल्यास अर्जाच्या अनुषंगाने करावी लागणारी विविध कायदेशीर कामे चालविण्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी झालेल्या विलंबाचे खर्चाच्या स्वरुपात परिमार्जन करणे मला उचित वाटते. सबब खालीलप्रमाणे पारीत करण्यात येत आहे :-

**-:: आदेश ::-**

१. न्यायाचे कारणे रक्कम रु.२००/- (रुपये दोनशे मात्र) खर्चाचे आदेश करुन निशाणी १४ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. वादीने सदर खर्चाची रक्कम रु.२००/- (रुपये दोनशे मात्र) प्रतिवादी यांस आदा केल्यावर; अर्जातील मागणी प्रमाणे नि.क्र.१० ते नि.क्र. १२ वर दुरुस्ती करावयाची आहे.

३. पुढील नेमल्या तारखेपर्यंत आदेशाची पुर्तता न केल्यास सदरचा आदेश स्वयंचलनाने (automatically) रद्द झाला असे समजण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by YASHODHAN PRADEEP BAVKAR
Date: 2024.06.12 15:31:19 +0530

ठिकाण – दोडामार्ग. (वाय. पी. बांवकर)
दिनांक – १२.०६.२०२४. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर)
दोडामार्ग.